॥ अग पोरी, संबाल ॥

गायिकाः पुष्पा पागधरे
गायकः महंमद रफी
गीतः वंदना विटणकर
संगीतः श्रीकांत ठाकरे

तोः अग पोरी, संबाल दर्याला तुफान आयलंय् भारी
तीः लाट पिर्तीची, भन्नाट होऊन आभाळिं घेई भरारी ॥ धृ. ॥

तोः नाय भिनार ग, येऊं दे पान्याला भरती
तीः माज्या होरीचं, सुकान तुज्याच हातीं
तोः नाव हांकीन मी, कापीत पाउसधारा
तीः मनी ठसला रं, तुजा ह्यो मर्दानी तोरा
तोः जाल्यांत गावली सोनेरी मास्ली
तीः नको करूं शिर्जोरी ॥ १ ॥

तोः तुज्या डोल्यांत ग, घुमतोय् वादलवारा
तीः तुज्या भवतीं र, फिरतोय् मनाचा भंवरा
तोः तुला बगून ग, उदान आयलंय् मनाला
तीः तुज्या पिर्तीचं, काहूर जाली जिवाला
तोः सुटनार नाय ग तुटनार नाय ग
तीः तुजी नि माजी जोरी ॥ २ ॥

तोः मी आनिन तुला, जर्तारी अंजिरी सारी
तीः मला पावली र, पिर्तीची दौलत न्यारी
तोः मी झुंजार ! साजीरि तूं माजि नवरी
तीः तुज्या संगतीनं, चाखीन सर्गाची गोरी
तोः थाटांतमाटांत गुल्लाबी बंगला--
तीः बांदूं या दर्याकिनारीं ॥ ३ ॥